# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३१(२)] मंगळवार, डिसेंबर २१, २०१०/अग्रहायण ३०, शके १९३२ [पृष्ठे ८
किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.**—मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . | १-८ |

दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५८ चा मुंबई ६५. २०१० चा महा. अध्या. १५.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी, मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील खंड (६) मध्ये, " जादा किंवा एकाच वेळी द्यावयाच्या कराचा " या मजकुरानंतर " किंवा पर्यावरण कराचा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९५८ चा मुंबई ६५.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ यामध्ये कलम ३क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पर्यावरण कर बसविणे.

" **३क.** (१) पाचव्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार वाहनांवर या अधिनियमाअन्वये बसविलेल्या कराव्यतिरिक्त स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी पर्यावरण कर या नावाचा एक ठोक रकमी कर बसविण्यात येईल व वसूल करण्यात येईल :

परंतु, जेव्हा वाहतुकेतर वाहनास किंवा कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस किंवा लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस यांवर चालविण्यात येणाऱ्या वाहतूक वाहनास, मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, त्या वाहनाच्या प्रथम नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षांहून अधिक कालावधी पूर्ण झाला असेल तर, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पर्यावरण कर बसविण्याच्या प्रयोजनांसाठी, त्या वाहनास १५ वर्षे पूर्ण झाली आहेत असे मानण्यात येईल : २०१० चा महा. ३०.

परंतु, आणखी असे की, जेव्हा कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस किंवा लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस यांवर चालविण्यात येणाऱ्या किंवा न येणाऱ्या विनिर्दिष्ट वाहतूक वाहनास, मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, त्या वाहनाच्या प्रथम नोंदणीच्या दिनांकापासून ८ वर्षांहून अधिक कालावधी पूर्ण झाला असेल तर, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पर्यावरण कर बसविण्याच्या प्रयोजनांसाठी, त्या वाहनास ८ वर्षे पूर्ण झाली आहेत असे मानण्यात येईल. २०१० चा महा. ३०.

(२) या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी या, कराच्या परताव्याशी संबंधित असलेल्या तरतुदी वगळून, पोट-कलम (१) अन्वये देय असलेला पर्यावरण कर बसविण्याच्या, त्याच्या आकारणीच्या व तो वसूल करण्याच्या संबंधात, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

" (४) राज्य शासन, पर्यावरण कराच्या उत्पन्नाचा वापर पुढील प्रयोजनांसाठी करील :—

(क) वाहनांची निरीक्षण केंद्रे स्थापन करणे व विकसित करणे,

(ख) प्रदूषण तपासणी केंद्रांचे जाळे निर्माण करणे व विकसित करणे,

(ग) हवेची गुणवत्ता तपासणी केंद्रे स्थापन करणे व विकसित करणे,

(घ) स्वच्छ इंधनाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे,

(ङ) संकरित तंत्रज्ञान किंवा सौर ऊर्जेवर चालविण्यात येणाऱ्या वाहनांच्या वापरास प्रोत्साहन देणे,

(च) सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला सक्षम बनविणे,

(छ) सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील वाहन चालकांना प्रशिक्षण देणे आणि त्यांच्यामध्ये पर्यावरण रक्षण करण्यासाठी जागरूकता वाढविणे,

(ज) योग्यता प्रमाणपत्र देणे किंवा त्याचे नुतनीकरण करणे यांसाठी प्रगत वाहन तपासणी स्थानके स्थापन करणे,

(झ) प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणात सुधारणा करण्यासाठी विविध पद्धती आणि यंत्रणा सुचविण्यासाठी संशोधन करणे.".

५. मुख्य अधिनियमाच्या चौथ्या अनुसूचीनंतर, पुढील अनुसूची जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ यात पाचवी अनुसूची जादा दाखल करणे.

" **पाचवी अनुसूची**

(कलम ३क पहा)

| अनुक्रमांक | वाहनाचा प्रवर्ग आणि आयुर्मान | पर्यावरण कराचा दर (रुपयांत) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (१) | ज्या वाहतुकेतर वाहनांना त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण झाली असतील अशा वाहनांच्या बाबतीत अशी १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक ५ वर्षांकरिता ठोक रकमेत,— | |
| | (क) दुचाकी . . . . . . . | २,००० |
| | (ख) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (पेट्रोलवर चालणारी वाहने) . . | ३,००० |
| | (ग) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (डिझेलवर चालणारी वाहने) . . | ३,५००. |
| (२) | (एक) ज्या वाहतूक वाहनांना त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून ८ वर्षे पूर्ण झाली असतील आणि जी वाहने कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सी.एन.जी.) किंवा लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (एल.पी.जी.) यावर | |

| अनुक्रमांक | वाहनाचा प्रवर्ग आणि आयुर्मान | पर्यावरण कराचा दर (रुपयांत) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | चालविण्यात येत नसतील अशा वाहतूक वाहनांच्या बाबतीत अशी ८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक ५ वर्षांकरिता ठोक रकमेत,— | |
| | (क) तिचाकी ऑटो रिक्शा . . . . . . | ७५० |
| | (ख) भाडे मीटर बसविण्यांत आलेली आणि सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्याची परवानगी असलेल्या टॅक्सी आणि जीपसारख्या मोटार कॅब्स (काळ्या व पिवळ्या रंगाच्या). | १,२५० |
| | (ग) पर्यटक टॅक्सी . . . . . . | २,५०० |
| | (घ) हलकी मालवाहू वाहने . . . . . . | २,५००. |
| | (दोन) ज्या वाहतूक वाहनांना त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण झाली असतील आणि जी वाहने कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सी.एन.जी.) किंवा लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (एल.पी.जी.) यावर चालविण्यात येत असतील अशा वाहतूक वाहनांच्या बाबतीत अशी १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक ५ वर्षांकरिता ठोक रकमेत,— | |
| | (क) तिचाकी ऑटो रिक्शा . . . . . . | ७५० |
| | (ख) भाडे मीटर बसविण्यात आलेली आणि सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्याची परवानगी असलेल्या टॅक्सी आणि जीपसारख्या मोटार कॅब्स (काळ्या व पिवळ्या रंगाच्या). | १,२५० |
| | (ग) पर्यटक टॅक्सी . . . . . . | २,५०० |
| | (घ) हलकी मालवाहू वाहने . . . . . . | २,५००. |
| (३) | ज्यांनी आपल्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून ८ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशी वरील नोंद (२) मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहतूक वाहने यांच्याबाबतीत त्यानंतर प्रत्येक वर्षांकरिता,— | |
| | (क) ७,५०० कि.ग्रॅ. पेक्षा जास्त एकूण वाहन वजन असलेले मध्यम, अवजड व जोड मालवाहू वाहने | वार्षिक कराच्या १० टक्के. |
| | (ख) कंत्राटी वाहतूक बसेस आणि पहिल्या अनुसूचीच्या खंड अ–सात मध्ये समाविष्ट केलेली मोटार वाहने | वार्षिक कराच्या २.५ टक्के. |
| | (ग) खाजगी सेवा वाहने . . . . | वार्षिक कराच्या २.५ टक्के. |

| अनुक्रमांक | वाहनाचा प्रवर्ग आणि आयुर्मान | पर्यावरण कराचा दर (रुपयांत) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | (घ) पर्यटक बसेस . . . . | वार्षिक कराच्या २.५ टक्के. |
| | (ङ) कॅम्पर व्हॅन (वाहतूक), टप्पा वाहन, विशेष उपयोगिता वाहन, फिरते चिकित्सालय, रुग्णवाहिका, क्ष-किरण व्हॅन, ग्रंथालय व्हॅन, फिरती कार्यशाळा, कॅश व्हॅन, शववाहिका, प्राण्यांची रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने आणि पहिल्या अनुसूचीच्या खंड अ—सहा मध्ये समाविष्ट केलेली वाहने. | वार्षिक कराच्या २.५ टक्के.". |

२०१० चा महा. अध्या. १५.

**६.** (१) मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, २०१० हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा यथास्थिती, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ४७(२) ] मंगळवार, डिसेंबर २१, २०१०/अग्रहायण ३०, शके १९३२ [ पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ९३

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Motor Vehicles Tax (Second Amendment) Act 2010 (Mah. Act No. XXX of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXX OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 21st December 2010.)*

An Act further to amend the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Bombay Motor Vehicles Tax (Amendment) Ordinance, 2010, on the 15th October 2010 ;

Bom. LXV of 1958.

Mah. Ord. XV of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India, as Follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Motor Vehicles Tax (Second Amendment) Act, 2010.

(2) It shall be deemed to have come into force on the 15th October 2010.

Amendment of section 2 of Bom. LXV of 1958.

**2.** In section 2 of the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958 (hereinafter referred to as " the principal Act "), in clause (*6*), after the words " additional or one time tax " the words " or environment tax " shall be inserted. Bom. LXV of 1958.

Insertion of section 3A in Bom. LXV of 1958.

**3.** After section 3 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Levy of environment tax.

" **3A.** (*1*) There shall be levied and collected a lump sum tax called the environment tax in addition to the tax levied under this Act on the motor vehicles used or kept for use in the State as specified in column (2) of the Fifth Schedule at the rates specified in column (3) thereof :

Provided that, where the transport motor vehicle running on the Compressed Natural Gas or Liquefied Petroleum Gas or the non-transport motor vehicle has completed more than 15 years from the date of first registration of such vehicle, on or before the date of commencement of the Bombay Motor Vehicles Tax (Second Amendment) Act, 2010, such vehicle shall be deemed to have completed 15 years for the purposes of levy of the environment tax, as specified in the Fifth Schedule : Mah. XXX of 2010.

Provided further that, where the specified transport vehicle, whether running on or not running on the Compressed Natural Gas or Liquefied Petroleum Gas has completed more than 8 years from the date of first registration of such vehicle, on or before the date of commencement of the Bombay Motor Vehicles Tax (Second Amendment) Act, 2010, such vehicle shall be deemed to have completed 8 years for the purposes of levy of the environment tax, as specified in the Fifth Schedule. Mah. XXX of 2010.

(*2*) The provisions of this Act and the Rules made thereunder excluding those relating to refund of tax, shall *mutatis mutandis* apply in relation to the levy, assessment and collection of the environment tax payable under sub-section (*1*). ".

Amendment of section 11 of Bom. LXV of 1958.

**4.** In section 11 of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :—

" (*4*) The State Government shall use the proceeds of the environment tax for the following purposes,—

(*a*) to establish and develop vehicle inspection centres,

(*b*) to establish and develop network of pollution checking centres,

(*c*) to establish and develop air quality testing centres,

(*d*) to encourage use of clean fuel,

(*e*) to encourage the use of vehicles running on solar energy or hybrid technology,

(*f*) to strengthen the public transport system,

(*g*) to train the drivers of the public transport system and enhance their awareness about preservation of environment,

(*h*) to establish advanced vehicle testing stations to issue or renew certificates of fitness,

(*i*) to undertake a research to suggest various methods and mechanisms to reduce pollution and to improve environment."

**5**. After Fourth Schedule to the principal Act, the following Schedule shall be added, namely :— Addition of Fifth Schedule in Bom. LXV of 1958.

" FIFTH SCHEDULE

(*See* section 3A)

| Sr. No. | Class and age of vehicle | **Rate of** environment tax in rupees |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| (1) | Non-transport vehicles which have completed 15 years from the date of their first registration, for every 5 years in lump sum, after completion of such 15 years,— | |
| | (*a*) Two wheeler | 2000 |
| | (*b*) Other than two wheeler (Petrol driven vehicles) | 3000 |
| | (*c*) Other than two wheeler (Diesel driven vehicles) | 3500. |
| (2) (I) | Transport vehicles which have completed 8 years from the date of their first registration, and not running on Compressed Natural Gas (CNG) or Liquefied Petroleum Gas (LPG), for every 5 years in lump sum, after completion of such 8 years,— | |
| | (*a*) Three wheeler auto-rickshaw | 750 |

FIFTH SCHEDULE—*contd.*

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | (*b*) Taxis fitted with fare meters and permitted to carry not more than six passengers and Jeep type motor cab (black and yellow). | 1250 |
| | (*c*) Tourist taxi | 2500 |
| | (*d*) Light goods vehicles | 2500. |
| (II) | Transport vehicles which have completed 15 years from the date of their first registration and running on Compressed Natural Gas (CNG) or Liquefied Petroleum Gas (LPG), for every 5 years in lump sum, after completion of such 15 years,— | |
| | (*a*) Three wheeler auto-rickshaw | 750 |
| | (*b*) Taxis fitted with fare meters and permitted to carry not more than six passengers and Jeep type motor cab (black and yellow). | 1250 |
| | (*c*) Tourist taxi | 2500 |
| | (*d*) Light goods vehicles | 2500. |
| (3) | Transport vehicles other than those covered in entry (2) above, which have completed 8 years from the date of their first registration, thereafter for every year,— | |
| | (*a*) Medium, Heavy and Articulated goods vehicles with gross vehicle weight more than 7500 kg. | 10 per cent. of annual tax. |
| | (*b*) Contract carriage buses and motor vehicles covered under Clause A-VII of the First Schedule. | 2.5 per cent. of annual tax. |
| | (*c*) Private service vehicles | 2.5 per cent. of annual tax. |
| | (*d*) Tourist buses | 2.5 per cent. of annual tax. |
| | (*e*) Camper Van (Transport), Stage Carriage Vehicle, Special Purpose Vehicle, Mobile Clinic, Ambulance, X-Ray Van, Library Van, Mobile Workshop, Cash Van, Hearse, Animal Ambulance, Fire Brigade Vehicles and motor vehicles covered under Clause A-VI of the First Schedule. | 2.5 per cent. of annual tax.". |

Mah. Ord. XV of 2010. **6.** (*1*) The Bombay Motor Vehicles Tax (Amendment) Ordinance, 2010, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. XV of 2010 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken, as the case may be, under the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI